**दिन विशेष...**

✻ जागतिक सामाजिक न्याय दिवस.

१७०७ : औरंगजेबाचे अहमदनगर येथे निधन झाले.

१९६५ : वासुदेव गणेश रानडे यांचे निधन.

१९८७ : मिझोराम व अरुणाचल या राज्यांना स्वतंत्र राज्याचा दर्जा देण्यात आला.

१९८८ : गीता सेठीने राष्ट्रीय बिलियर्ड स्पर्धा जिंकली.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८२,४९८.१४ -१,२३६.११ (१.४८%)

डॉलर ₹ ९१.१२

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३६ | २२ |
| दिल्ली | २८ | १५ |
| मुंबई | ३४ | २२ |
| नागपूर | ३३ | १८ |
| पुणे | ३३ | १५ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक १०२ किंमत : ५ रु. | पाने ४

**सुविचार**

मैत्री ही अमूल्य आहे; ती जपून ठेवा, कारण खरी मैत्री कधीच मोडत नाही.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:५५ संध्या-६:२८

**सोने - चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५९,३८५/- २,७०,०००/-

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# हळदीच्या मंडपात किरकोळ वादातून बापलेकासह तिघांची हत्या

## चौघे गंभीर जखमी; सोनगड येथील दोन संशयित जेरबंद

प्रतिनिधी । साक्री






**तालुक्यातील पिंपळनेर येथे एका कौटुंबिक विवाह समारंभ प्रसंगी दोन गटात वाद झाल्याची घटना आज गुरुवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास घडली. या वादातून धारदार शस्त्राने वार करून तिघांचा खून करण्यात आला. तर चार जण गंभीर जखमी झाल्याचे समजते. या घटनेत सोनू गोसावी, देवेंद्र पवार यांचा जागीच मृत्यू झाला. तर साई गोसावी यांचा धुळ्यात खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. याप्रकरणी सोनगड येथील दोन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तसेच याप्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पिंपळनेर येथे लग्न मंडपात हळदीचा कार्यक्रम सुरू असताना लग्नघर अचानक भीषण हिंसाचाराने हादरले. त्यामुळे हळदीचा मंडप रक्ताने माखलेला दिसून आला. पिंपळनेर येथील नीलकंठ नगरात गोसावी समाजाच्या लग्न कार्यादरम्यान धारदार शस्त्राने झालेल्या हल्ल्यात तिघांचा मृत्यू झाला आहे. तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना आज गुरुवारी दुपारी सुमारे १ वाजेच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, हळदीच्या दिवशी साखरपुड्याची तयारी सुरू असताना साक्री आणि सोनगड येथून आलेल्या नातेवाईकांमध्ये आधीपासूनच वाद सुरू होता. साखरपुड्यापूर्वी काही नातेवाईकांनी व्हॉट्सअ‍ॅपवर आक्षेपार्ह संदेश आणि व्हिडिओ प्रसारित केल्याने तणाव अधिक वाढला. याच वादातून लग्नस्थळी अचानक कुरापत काढत धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आल्याचे पोलीस तपासात पुढे येत आहे. या हल्ल्यात देवेंद्र ज्ञानेश्वर पवार (वय ३५), सुरेशगीर मोजगीर गोसावी (वय ५५) आणि साहिल सुरेश गोसावी (वय २२) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच साहिल सुरेश गोसावी, पंकज अशोक गीर, सुरेश सुपडू गीर आणि (पान २ वर)

# बिश्नोई गँगकडून भाजपच्या नेत्याला खंडणीची धमकी

## अकोल्याचे आ.भारसाकळे यांच्याकडून २ कोटी वसूल करुन द्या; अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागतील

वृत्तसंस्था । अकोला



**शहरात मोठी खळबळ उडाली असून बिश्नोई गँगकडून भाजपच्या बड्या नेत्याला खंडणीची धमकी दिल्याची माहिती समोर आली आहे.**

सिग्नल अ‍ॅपद्वारे आलेल्या संदेशातून अकोट मतदारसंघाचे भाजप आमदार प्रकाश भारसाकळे यांच्याकडून २ कोटी रुपये वसूल करून द्यावेत, अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

ही धमकी बिश्नोई गँगशी संबंधित शुभम लोणकर याने दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. घटनेची माहिती मिळताच अकोला पोलिसांनी तपास सुरू केला असून संबंधित पदाधिकाऱ्याला बंदूकधारी पोलिस सुरक्षा देण्यात आल्याचे समजते. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अकोट परिसरात तैनात आहे.

या आधीही शुभम लोणकर याच्यावर अकोला पोलिसांनी कारवाई करत तब्बल ३ पिस्टलसह काही जिवंत काडतूस जप्त केल्या होत्या. लॉरेन्स बिश्नोई आणि त्याचा लहान भाऊ अनमोल बिश्नोई यांच्या संपर्कात असणाऱ्या शुभम लोणकरला बंदुकीच्या तस्करी प्रकरणात अकोला पोलिसांनी गजाआड केले होते.

### ➤ कोण आहे शुभम लोणकर?

**या आधी राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येची आणि आता रोहित शेट्टीच्या घराबाहेर झालेल्या गोळीबाराची जबाबदारी स्वीकारणारा शुभम लोणकर आहे. शुभम लोणकर हा मूळ अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील नेव्होरी गावाचा रहिवासी आहे.**

## थोडक्यात

### दहा दिवसांच्या बाळाला घेऊन सावित्रीची लेक देतेय परीक्षा!

**नांदेड ।** पाठीवर बाळाला बांधून झाशीच्या राणीने स्वातंत्र्याची लढाई लढली होती, तद्वतच दहा दिवसांचे बाळ सोबत घेऊन एक माता शिक्षणाची लढाई लढत आहे. स्वामी रामानंदतीर्थ यांनी स्थापन केलेल्या पीपल्स महाविद्यालयात बारावीच्या परीक्षेच्या निमित्ताने हे प्रेरणादायक वास्तव समोर आले. ही सावित्रीची खरीखुरी लेक मुलींसह एकूणच विद्यार्थी समुदायापुढे आदर्श आहे. कॉपीमुक्ती अभियान आणि सोशल मीडियावरील बोभाटा यामुळे यंदा परीक्षा प्रचंड चर्चेत आहेत.




### सूर्यकुमार यादवचा 'तो' एक निर्णय ठरला ऐतिहासिक!

**मुंबई ।** भारतात सध्या टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेचा थरार सुरू आहे. या स्पर्धेत भारतीय संघाचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. सूर्यकुमार यादव पहिल्यांदाच मोठ्या स्पर्धेत भारतीय संघाचं नेतृत्व करण्यासाठी मैदानात उतरला आहे. पहिल्या सामन्यापासून भारतीय संघाने चॅम्पियनसारखा खेळ केला आहे. सुपर ८ मध्ये स्थान मिळवल्यानंतर नेदरलँड्सविरुद्धचा सामना हा भारतीय संघासाठी सराव सामन्यासारखाच होता. या सामन्यात भारतीय संघाने दमदार खेळ केला आणि एकतर्फी विजयाची नोंद केली. भारतीय संघ या स्पर्धेत अजिंक्य आहे. दरम्यान या सामन्यात भारतीय संघाने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

## • ५.५ रिश्टर स्केलची तीव्रता, जगाला अणु चाचण्यांचा संशय

# इराण तीव्र भूकंपाने हादरला

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन



**अमेरिकेशी युद्धाच्या तयारीदरम्यान, इराणला एका शक्तिशाली भूकंपाने हादरवून टाकले. दक्षिण इराणमध्ये भूकंपाची तीव्रता ५.५ इतकी होती.**

जर्मन भूगर्भीय संशोधन केंद्राच्या मते, इराणमध्ये भूकंपाचे केंद्र १० किलोमीटर खोलीवर आढळले. तथापि, अचानक झालेल्या भूकंपामुळे इराणने अणुचाचणी केली आहे का? याबद्दल प्रश्न उपस्थित झाले आहेत.

जर असे घडले असेल, तर ते संपूर्ण जगासाठी चिंतेचे कारण असेल, कारण अमेरिका इराणवर हल्ला करण्यास पूर्णपणे तयार आहे. दुसरीकडे, इराणने अमेरिकेने हल्ला केल्यास त्यांच्या दोन्ही युद्धनौका बुडवण्याची धमकी देखील दिली आहे. या धोक्यात, इराणमध्ये अचानक आलेल्या भूकंपामुळे अणुशस्त्र चाचणीकडे लक्ष वेधले जाते. इराणी भूकंप तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, दक्षिण इराण हा भूकंपप्रवण क्षेत्र आहे. येथे टेक्टोनिक प्लेट्स वारंवार बदलत असतात, ज्यामुळे या प्रदेशात वारंवार भूकंपाच्या हालचाली होतात. अणुचाचणी किंवा इतर असामान्य हालचालींची अधिकृत पुष्टी झालेली नाही. जर्मन सेंटर फॉर जिओलॉजिकल रिसर्चसह आंतरराष्ट्रीय एजन्सी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.


### • भूकंपामुळे दहशत पसरली

**भूकंपतज्ज्ञांच्या मते, भूकंप खूप कमी खोलीवर झाला होता, परंतु त्याचा धक्का तीव्र होता आणि मोठ्या भागात जाणवला. प्रभावित भागातील लोकांमध्ये घबराट पसरली आहे. देशाच्या सरकारने आपत्कालीन पथकांना देखील सतर्क केले आहे आणि मदत आणि आपत्ती प्रतिसाद पथके क्षेत्रात तैनात केली आहेत. भूकंपामुळे झालेल्या नुकसानीमुळे आणि भूकंपानंतरच्या धक्क्यांच्या शक्यतेमुळे हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.**

# कॉपी बहाद्दरांवर सीसीटीव्हीचा वॉच

## • दहावीच्या परीक्षेसाठी नाशिक विभाग सज्ज!

वृत्तसंस्था । पुणे



**राज्य शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेस शुक्रवारपासून सुरुवात होत आहे. नाशिक विभागातून दोन लाख सहा हजार ६११ परीक्षार्थी असून त्यात नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक ९६, ६३४ परीक्षार्थी आहेत.**

यंदा कॉपीमुक्त परीक्षेसाठी शिक्षण मंडळाच्या वतीने परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची सक्ती करण्यात आली आहे. बहुसंख्य परीक्षा केंद्रावर तशी व्यवस्था आहे. मात्र ग्रामीण भागात अद्याप काही केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले नाहीत. यामुळे काही (पान २ वर)




## अमृता फडणवीसांनी ॲक्सिस बँकेचा दिला राजीनामा

**नागपूर ।** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी ॲक्सिस बँकेतील नोकरीचा राजीनामा दिला आहे. या संदर्भातील माहिती अमृता फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर (ट्विटर) पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे. अमृता फडणवीस यांनी जवळपास २३ वर्षे बँकिंग क्षेत्रात काम केलं आहे. २३ वर्षे बँकिंग (पान २ वर)



**नारायणगाव :** छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती भव्य आणि जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यावरील अतिक्रमणे हटवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता,तो शब्द सरकारने पूर्ण केला. किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी फडणवीस बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा आदी उपस्थित होते.




# शिवरायांची साक्ष असलेले राज्यातील किल्ले अतिक्रमणमुक्त : मुख्यमंत्री फडणवीस

## मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत शिवनेरीवर पाळणा हलवून शिवजन्मोत्सव साजरा

वृत्तसंस्था । जुन्नर

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने शिवनेरीसह छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामांकित झाले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे शिवनेरीवर विशेष प्रेम होते. त्यांनी आणि आम्ही शिवरायांच्या कार्याची साक्ष असलेले राज्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय घेतला. पुणे जिल्ह्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त केले आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांचा २०३० मध्ये होणारा ४०० वा जयंती सोहळा अतिशय भव्य आणि जगभरचे डोळे दिपतील, असा साजरा केला जाणार आहे, अशी घोषणा त्यांनी केली.**

मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत शिवनेरी येथे पारंपरिक पद्धतीने पाळणा हलवून शिवजन्म सोहळा झाला. त्यानंतर पोलीस पथकाने बंदुकीच्या तीन फैरी झाडून छत्रपती शिवरायांना मानवंदना देण्यात आली . तसेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी बालशिवाजी, जिजाऊंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची पालखी वाहिली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शिवनेरीसह छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामांकित झाले.त्यास २७ देशांनी एकमताने त्यास मान्यता दिली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी संबंधित प्रमाणपत्र स्वीकारले. त्यामुळे शिवरायांचे किल्ले आता अधिकृतपणे जागतिक वारसा स्थळ म्हणून गौरवले गेले आहेत. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आम्ही शिवरायांच्या कार्याची साक्ष असलेले राज्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय घेतला. तसेच पुणे जिल्ह्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त केले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यात समता, सन्मान, न्याय आणि स्त्रीसुरक्षा यांना प्राधान्य होते. शेतकरी समाधानी राहील, अन्याय-अत्याचार होणार नाहीत, अशी राज्यव्यवस्था त्यांनी उभी केली, छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आज भारताचा इतिहास आणि भूगोलही वेगळा असता. अनेक राजे-राजवाडे मोगलांच्या आधिपत्याखाली काम करत असताना आई जिजाऊंनी घडविलेल्या छत्रपती शिवरायांनी रयतेचे स्वराज्य स्थापन करून हिंदुस्थानाला नवी दिशा दिली. राज्यकारभारात विविध सुधारणा करताना शिवाजी महाराजांनी सुमारे ५० प्रकारचे कर रद्द करून सुटसुटीत (पान २ वर)

## संपादकीय

### भारतीय शेतीचे भवितव्य

भारत आणि अमेरिका यांच्यातील प्रस्तावित व्यापार करारावरून देशभरात तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. हा करार भारतीय शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, लोकशाही प्रक्रिया आणि जागतिक राजकारण यांच्याशी थेट संबंधित आहे. भारत–अमेरिका व्यापार कराराच्या प्रारूपानंतर अनेक शेतकरी संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांच्या चिंता केवळ सोयाबीन तेल, धान्य किंवा सफरचंदावरील आयात शुल्क सवलतीपुरत्या मर्यादित नाहीत. या चिंता विश्वास, पारदर्शकता आणि भारतीय शेतीच्या भवितव्याशी संबंधित आहेत.

सरकारकडून वारंवार आश्वासन दिले जात आहे की, शेती आणि दुग्ध उद्योग संरक्षित राहतील; परंतु कराराच्या मजकुरात अनेक कृषी आणि अन्नपदार्थांवरील शुल्क कमी करण्याची आणि गैरशुल्क अडथळे हटवण्याची तरतूद असल्याचे सांगितले जात असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. याआधी युरोपियन युनियन आणि न्यूझीलंडसोबत झालेल्या मुक्त व्यापार करारांमुळे स्वस्त आयात मोठ्या प्रमाणावर वाढली आणि त्याचा फटका स्थानिक उत्पादकांना बसला. मुक्त व्यापार करारांचा इतिहास पाहिला तर, ते अनेकदा जागतिक व्यापाराच्या विस्तारासाठी महत्त्वाचे साधन ठरले आहेत. जागतिक व्यापार संघटना (डब्ल्यूटीओ) स्थापनेनंतर टॅरिफ कमी करणे, बाजारपेठा खुल्या करणे आणि बहुपक्षीय व्यापार व्यवस्था निर्माण करणे हे जागतिक धोरण बनले. परंतु जागतिक दक्षिणेकडील अनेक देशांचा अनुभव असा आहे की मुक्त व्यापार करारांचा लाभ मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या, निर्यातदार आणि प्रगत अर्थव्यवस्था यांना मिळतो, तर लहान शेतकरी, स्थानिक उद्योग आणि असंघटित कामगार वर्गावर त्याचा विपरीत परिणाम होतो. एफएओ आणि यूएनसीटीएच्या अभ्यासानुसार, अनेक विकासशील देशांमध्ये कृषी बाजार खुला केल्यानंतर ग्रामीण उत्पन्नातील असमानता वाढली आणि लहान शेतकऱ्यांचे स्थिर उत्पन्न घटले. सफरचंद उद्योगाचे उदाहरण विशेष उल्लेखनीय आहे. हिमाचल प्रदेश, जम्मू–काश्मीर आणि उत्तराखंडमध्ये सफरचंद हे केवळ पीक नसून संपूर्ण पर्वतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. अमेरिकन सफरचंदांवरील आयात शुल्क कमी झाल्यास आणि किमान आयात मूल्य वाढवल्यास हे सफरचंद भारतीय प्रीमियम सफरचंदांच्या किमतीत बाजारात उपलब्ध होतील. परिणामी, भारतीय ग्राहक समान किमतीत अधिक दर्जेदार आयातीत सफरचंदांना पसंती देतील आणि स्थानिक उत्पादकांचा बाजार हिस्सा घटेल. कोल्ड स्टोरेजमध्ये सफरचंद साठवणे तोट्याचे ठरू शकते आणि स्थानिक उद्योग संकटात सापडू शकतो. सोयाबीन आणि धान्याच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. भारतात सोयाबीन उत्पादन प्रामुख्याने लहान आणि सीमांत शेतकऱ्यांद्वारे होते. एक एकर जमिनीत साधारणतः १ मेट्रिक टन सोयाबीन उत्पादन होते, तर अमेरिकेत जीएम सोयाबीनच्या माध्यमातून ३ मेट्रिक टनपर्यंत उत्पादन होते. ही उत्पादकतेची दरी भारतीय शेतकऱ्यांसाठी असमान स्पर्धा निर्माण करते. त्यातच अमेरिकन शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर सरकारी सबसिडी मिळते. अमेरिकन शेतकऱ्यांना दरवर्षी सरासरी ६६ हजार डॉलर इतकी सबसिडी मिळते आणि २०२६ साठी १२ अब्ज डॉलरचा विशेष सहाय्य कार्यक्रम प्रस्तावित आहे. याच्या तुलनेत भारतीय शेतकऱ्यांना मिळणारी मदत मर्यादित आहे आणि अनेकदा एमएसपीपेक्षा ३० ते ४० टक्के कमी दरात उत्पादन विकावे लागते. अशा परिस्थितीत मुक्त व्यापार म्हणजे असमान मैदानावर खेळण्यासारखे आहे. हा करार केवळ आर्थिक नसून राजकीयही आहे. अमेरिकेत मध्यावधी निवडणुका जवळ आल्या आहेत आणि कृषी क्षेत्र हा अमेरिकन राजकारणातील प्रभावी घटक आहे. चीनसोबतच्या व्यापार युद्धामुळे अमेरिकन शेतकऱ्यांना मोठे नुकसान झाले आणि निर्यात बाजार घटला. त्यामुळे ट्रम्प प्रशासनाला नवीन बाजारपेठांची गरज आहे.

# दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक प्रभावी करण्यावर भर देण्याची गरज

**● आयुक्त नितीन कापडणीस यांच्या संकल्पनेतून साकारली कार्यशाळा**

प्रतिनिधी । धुळे

**समग्र शिक्षा मनपा शिक्षण मंडळ धुळे यांच्या समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक प्रभावी व सुलभ करण्यासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य निर्मिती (टिएलएम) या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन महानगरपालिका हायस्कूल, धुळे येथे करण्यात आले. या कार्यशाळेत शिक्षकांनी उत्साहाने सहभाग घेतला.**





सदर कार्यशाळा आयुक्त नितीन कापडणीस यांच्या कल्पनेतून व अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. प्रशासन अधिकारी विश्वंभर दासरवाड यांनी समावेशक शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अध्यापन पद्धतीत बदल करण्याचे आवाहन केले.

यावेळी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी जितेंद्रसिंग सिसोदिया यांनी विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी कमी खर्चातील विविध शैक्षणिक साहित्य तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले. शिक्षकांनी गटांमध्ये प्रत्यक्ष टिएलएम तयार करून सादरीकरण केले.

या कार्यशाळेमुळे दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक परिणामकारक होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक गोपाल पवार यांनी परिश्रम घेतले.

## नवनिर्वाचित महापौर–उपमहापौर, नगरसेवकांचा रविवारी सत्कार

प्रतिनिधी । जळगाव

भोरगाव लेवा पाटीदार पंचायत ठाया पाडळसे जळगाव विभाग यांच्यावतीने नवनिर्वाचित महापौर उपमहापौर तसेच नगरसेवक यांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन दि. २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जुना खेडी रोड, शंकरराव नगर, जळगाव येथे करण्यात आले आहे. जळगाव महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये ज्या नगरसेवकांनी यश संपादन करून विजय प्राप्त केला. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचा सत्कार करावा. जळगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, जनसेवेच्या आगामी प्रवासाला शुभेच्छा देण्यासाठी भोरगाव लेवा पाटीदार पंचायत ठाया पाडळसे जळगाव विभागच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जळगाव विभाग प्रमुख विष्णू भंगाळे, सचिव प्रा.डॉ. प्रशांत वारके, आयोजन समिती प्रमुख प्रा.डॉ.पी.आर.चौधरी यांनी केले आहे.

## चोपडा शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

**येथील शिक्षण शास्त्र महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. रजनी सोनवणे या होत्या.**



कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्या डॉ. रजनी सोनवणे यांनी शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा व दूरदृष्टीचा गौरव केला. अफजलखान पराभवाचे उदाहरण देत त्यांनी महाराजांच्या धैर्य, कुशल रणनिती आणि नेतृत्वगुणांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

विद्यार्थ्यांनी जीवनात शिस्त, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रनिष्ठा जोपासावी, असे आवाहन त्यांनी यापप्रसंगी केले. यावेळी माधुरी चौधरी, शोएब शेख, ज्ञानेश्वर कोळी, मयुरी पाटील, योगिनी चौधरी व अश्विनी पवार या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त करून शिवचरित्रातील प्रेरणादायी पैलूंवर प्रकाश टाकला. सुवर्णा बिऱ्हाडे व शितल महाजन यांनी शिवगर्जना सादर करून उपस्थितांमध्ये उत्साह संचारला. कार्यक्रमास माजी प्राचार्य एम.पी.पाटील, प्रा.डॉ.सविता जाधव तसेच बी.एड.चे सर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन प्रा.डॉ.सविता जाधव यांनी केले.

## सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणार तोरणमाळ महोत्सव

प्रतिनिधी । शहादा

**सातपुडा पर्वतरांगांच्या कुशित वसलेले निसर्गरम्य तोरणमाळ हे राज्यातील एक महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जाते. या पर्यटनस्थळाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी तसेच आदिवासी समाजाच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविण्यासाठी दि.२० ते २२ फेब्रुवारी या कालावधीत तीन दिवसीय तोरणमाळ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.**

जिल्हाधिकारी डॉ.मिताली सेठी यांनी यासंदर्भात सविस्तर आदेश निर्गमित करून विविध विभागांना स्पष्ट जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत. महोत्सव काळात मोठ्या प्रमाणावर पर्यटक व नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने नियोजनबद्ध पद्धतीने सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयास कार्यक्रमस्थळी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, गर्दी नियंत्रण, तसेच वाहतुकीचे सुयोग्य नियमन करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कार्यक्रमादरम्यान पर्यटकांना कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी आवश्यक तेवढा पोलिस बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. या महोत्सवाला येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## पान १ वरुन

**हळदीच्या मंडपात किरकोळ......**

सागर गोसावी हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना प्रथम ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. गंभीर जखमींपैकी एकास पुढील उपचारासाठी धुळे जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. याप्रकरणी कानागिरी मुलागिरी गोसावी, यशवंत गोपाल गोसावी, अनिल गिरी हटुगिरी गोसावी, सोनुगिरी गोसावी, विजुगिरी हटुगिरी गोसावी, कमलेश गिरी शंभू गिरी गोसावी आणि हर्ष शंभू गोसावी यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. लग्न सोहळ्यातील या रक्तरंजित घटनेमुळे पिंपळनेर परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. शहरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.

**कॉपी बहाद्दरांवर......**

केंद्रांवर परीक्षा ही सीसीटीव्ही कॅमेऱ्यांशिवाय होईल, असे चित्र आहे. कॉपीमुक्त अभियानातर्गत शिक्षण मंडळाच्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांच्या मनातील शंका दूर करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. परीक्षा केंद्राजवळील झेरॉक्स दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत. संवेदनशील परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त राहणार आहे. नाशिक विभागात धुळे जिल्ह्यात २९,२४६, जळगाव ५९,४७८, नंदुरबार २१,२५३ आणि नाशिक जिल्ह्यात ९६,६३४ इतके परीक्षार्थी आहेत. विभागातील परीक्षार्थींमध्ये एक हजार ५३७ अपंगांचा समावेश आहे. त्यांच्यासाठी लेखनिकची व्यवस्था करण्यात आली आहे. विभागात नाशिकमध्ये २२४ केंद्र असून २६ परीक्षकांची नियुक्ती करण्यात आली. धुळे येथे ७२ परीक्षा केंद्रांसाठी आठ परीक्षक, जळगाव येथे १४७ परीक्षा केंद्रासाठी १८ परीक्षक, नंदुरबार येथे ४९३ केंद्रांसाठी ६० परीक्षकांची नियुक्ती करण्यात आली. परीक्षेदरम्यान अनुचित प्रकार रोखण्यासाठी विभागात नऊ भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये विभागस्तरासाठी, जिल्हाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था त्या संस्थेतील वर्ग दोनचे अधिकारी, माध्यमिक शिक्षणाधिकारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी, माध्यमिक उपशिक्षणाधिकारी, शिक्षण विभागातील महिला अधिकारी वर्ग एक व दोनच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तणावमुक्ततेसाठी विद्यार्थ्यांशी संवाद – विद्यार्थ्यांवर परीक्षेचा ताण येऊ नये यासाठी शिक्षण मंडळाच्या वतीने समुपदेशकाची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांवर असणारा परीक्षेचा ताण पाहता परीक्षा किंवा त्या संबंधित काही तक्रार, शंका असल्यास विद्यार्थी, पालकांनी किरण बावा (९४२३१८४१४१, ९४२३०२६३०२), अरूण जायभावे (९६५७५०१७७३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन शिक्षण मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

**अमृता फडणवीसांनी......**

क्षेत्रात काम केल्यानंतर आज अमृता फडणवीस यांनी त्यांच्या नोकरीचा स्वेच्छेने राजीनामा दिला असल्याचं त्यांनीच एक्सवरील (ट्विटर) पोस्टमध्ये स्पष्ट केलं आहे.'मी २३ वर्षांपूर्वी एक व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी म्हणून ॲक्सिस बँकेत रुजू झाले होते. पण आज मी वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून माझ्या पदाचा राजीनामा देत आहे. यावेळी माझं हृदय कृतज्ञतेनं भरून आलं आहे. शाखा कामकाजापासून ते कॉर्पोरेट बँकिंग आणि ट्रेझरी ते ग्राहक संबंधांपर्यंतच्या अनुभवामुळे ही संस्था माझ्यासाठी कुटुंब, शिक्षक आणि दुसरं घर राहिली. बँकेतील माझे सर्व सहकारी आणि वरिष्ठ, विशेषतः एमडी आणि सीईओ अमिताभ चौधरी यांच्या पाठिंब्याबद्दल मी आभारी आहे. हा सुंदर अध्याय येथे संपत असताना मी आयुष्यभराचे धडे आणि मैत्री घेऊन जात आहे. धन्यवाद, ॲक्सिस बँक'फ, असं अमृता फडणवीस यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**शिवरायांची साक्ष असलेले......**

करप्रणाली निर्माण केली. पाणी, जंगल यांचे नियोजन केले. भविष्यातील धोका ओळखून समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणांना रोखण्यासाठी जलदुर्ग उभारले. पोर्तुगीजांवर विजय मिळवून पश्चिम किनारपट्टी सुरक्षित केली. छत्रपतींच्या कारकिर्दीत समुद्रमार्गे आक्रमण करण्याची हिंमत कुणालाही झाली नाही, शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष राज्यातील गड किल्ले देत आहेत असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## आंतरजिल्हा युवा आदान–प्रदान कार्यक्रमाचा शुभारंभ

प्रतिनिधी । जळगाव

मेरा युवा भारत, जळगाव यांच्यावतीने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे १८ ते २४ फेब्रुवारीदरम्यान आंतरजिल्हा युवा आदान–प्रदान कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. कार्यक्रमाचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. प्रमुख पाहुणे जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, डॉ. केतकी पाटील उपस्थित होते.

## मोठा माळी वाड्यात महिला भगिनींनी शिवजन्मोत्सव केला साजरा

प्रतिनिधी । धरणगाव

**कुळवाडी भूषण, बहुजन प्रतिपालक, बहुजनांचा राजा, छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव मोठा माळीवाडा परिसरातील ग्रामीण भागात महिला भगिनींनी मोठ्या उत्साहात साजरा केला.**



कार्यक्रमावेळी परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रसंगी वाराबाई वारुळे, मंगला माळी, वंदना महाजन, ललिता वाघ, रेखा वारुळे, ललिता महाजन तसेच इतर महिला भगिनी उपस्थित होत्या. सर्वांनी एकत्र येत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून अभिवादन केले. शिवरायांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. महिलांनी शिवरायांच्या कार्याचे स्मरण करत त्यांच्या विचारांप्रती आदर व्यक्त केला. रेखा वारुळे यांनी मनोगतात सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य हे आजही प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. स्वराज्य स्थापनेबरोबरच त्यांनी स्त्रियांच्या सन्मानाला सर्वोच्च स्थान दिले. महिलांप्रती आदर, त्यांची सुरक्षितता आणि सन्मान याबाबत त्यांनी नेहमी कठोर भूमिका घेतली. राज्यकारभारात शिस्त, न्याय आणि स्त्री सन्मान या गोष्टींना त्यांनी विशेष महत्त्व दिले. त्यामुळे सर्व संत–महापुरुषांचा जन्मोत्सव प्रत्येक महिलांनी साजरा करणे आवश्यक आहे, असेही वारुळे म्हणाल्या.



## कास्ट्राईब कर्मचारी संघटनेतर्फे छ.शिवाजी महाराजांना अभिवादन

प्रतिनिधी । जळगाव

जिल्हा परिषदेतील कास्ट्राईब कर्मचारी संघटनेतर्फे शिवजयंती निमित्त शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी राज्य उपाध्यक्ष सुनील सोनवणे, जिल्हाध्यक्ष आर. टी. सोनवणे, महासंघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. मिलिंद बागुल, बापूराव पानपाटील, एस.के.राणे–राजपूत आदी उपस्थित होते.

## अडावद सनराइज किड्स स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील अडावद येथे गगनभेद बहुउद्देशीय संस्था संचलित सनराइज किड्स स्कूल अडावद येथे १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**




छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष सनराइज किड्स स्कूलचे चेअरमन शाम आर.महाजन यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि भारताच्या इतिहासातील एक तेजस्वी व्यक्तिमत्व होते. त्यांच्या जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांच्या आई जिजाबाई यांनी त्यांना लहानपणापासून रामायण, महाभारत यासारख्या ग्रंथांच्या कथा सांगून धर्म, शौर्य आणि न्याय यांचे संस्कार दिले. तसेच शहाजीराजे भोसले यांच्याकडून त्यांना युद्ध कौशल्याचा वारसा मिळाला. लहान वयात शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न पाहिले. त्या काळात देशावर मुघल आणि आदिलशाही यांचे राज्य होते. जनतेवर अनेक प्रकारचे अन्याय होत होते. हे अन्याय दूर करण्यासाठी शिवाजी महाराजांनी मावळ्यांच्या साथीने किल्ले जिंकण्यास सुरुवात केली. तोरणा, रायगड, सिंहगड असे अनेक किल्ले त्यांनी आपल्या ताब्यात घेतले. शिवाजी महाराज हे केवळ एक पराक्रमी योद्धे नव्हे, तर ते उत्तम प्रशासकही होते. त्यांनी अष्टप्रधान मंडळाची स्थापना करून सुयोग्य प्रशासन व्यवस्था उभी केली. त्यांच्या राज्यात स्त्रियांचा सन्मान राखला जात असे. परस्त्रि मातेसमान ही शिकवण त्यांची आजही समाजाला प्रेरणादायी ठरते. ६ जून १६७४ रोजी रायगडावर त्यांच्या भव्य राज्याभिषेक झाला आणि ते छत्रपती म्हणून ओळखले जाऊ लागले. हिंदवी स्वराज्याची स्थापना करून त्यांनी जनतेला सुरक्षितता व न्याय दिला, अशी माहिती त्यांनी दिली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भिका पाटील, रंजना पाटील हे लाभले होते. सनराइज किड्स स्कूलच्या मुख्याध्यापिका बोरसे यांनी प्रास्ताविक केले आणि विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांबद्दल माहिती देखील सांगितले. सूत्रसंचालन मोनाली पाटील तर आभार प्रबोधन हर्षदा चौधरी यांनी मानले. अश्विनी चौधरी यांनी सहकार्य केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# छत्रपती शिवरायांचा इतिहास संपूर्ण विश्वासाठी प्रेरणादायी

## जिल्हा प्रशासन-सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या कार्यक्रमात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे प्रतिपादन





प्रतिनिधी । जळगाव

**छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांचे श्वास आणि प्राण आहेत. शिवरायांचा इतिहास फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण विश्वासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.**

जिल्हा प्रशासन व जळगाव शहर सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकूल येथे आयोजित शिवजयंती उत्सव कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास वस्त्रोद्योग मंत्री तथा सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष संजय सावकारे, महापौर दीपमाला काळे, आमदार राजूमामा भोळे, उपमहापौर मनोज चौधरी, माजी मंत्री गुलाबराव देवकर, जैन उद्योग समूहाचे चेअरमन अशोक जैन, अपर जिल्हाधिकारी डॉ.श्रीमंत हारकर, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री गुलाबराव पाटील पुढे म्हणाले की, सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती जळगाव गेल्या २६ वर्षांपासून सातत्याने आणि सर्वसमावेशक पद्धतीने शिवजयंती साजरी करत असून समाजातील सर्व जाती-धर्मांनासोबत घेऊन शिवरायांची जयंती साजरी करण्याची परंपरा जळगाव शहरात रुजवली आहे, असेही त्यांनी सांगितले. वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यावेळी आपल्या मनोगतात म्हणाले, आपल्या देशाचे महापुरुष व जे शूर वीर आहेत त्यांना कुठल्याही जाती धर्मात बांधता कामा नये, त्यांनी जी कामे केली आहेत ती प्रत्येक जाती-धर्मासाठी व या देशासाठी केली आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या देशाला हिंदुत्वाची कास दिली. आपला धर्म व संस्कार जागृत ठेवला. त्यामुळे आज आपण हिंदू म्हणून अभिमानाने जगतोय, ही सर्व कृपा छत्रपती शिवाजी महाराजांची आहे. शिवजयंती उत्सवात सर्व जाती धर्माचे, पक्षाचे लोक एकत्र सहभागी झाले असल्याचे सांगून मंत्री सावकारे यांनी शिवजयंती कार्यक्रमानिमित्त जमलेल्या सर्व शिवप्रेमीं, शिवभक्तांना यावेळी शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात उपस्थित शिवभक्तांच्या जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यावर आधारीत जिवंत देखाव्यांच्या माध्यमातून शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत विविध शाळांचे, महाविद्यालयांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. सूत्रसंचालन सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे समन्वयक शंभू पाटील यांनी केले.

**या कार्यक्रमाच्या नियोजनाचे कौतुक करत पालकमंत्री पुढे म्हणाले की, शिवजयंती म्हणजे केवळ उत्सव नव्हे, तर एक सामाजिक एकात्मतेचा संदेश आहे. सर्व समाजघटकांना सोबत घेऊन शिवरायांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम ही समिती सातत्याने करत आहे, हे खरोखरच कौतुकास्पद आहे. छत्रपती शिवाजी महाराज प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी ठरतात, शिवरायांचा आदर्श प्रत्येकाने आपल्या कृतीत उतरवला पाहिजे. शिवरायांचे चरित्र हे सर्वांसाठी कायम प्रेरणादायी आणि ऊर्जास्रोत राहणार आहे. शिवजयंती महोत्सव समितीच्या उपक्रमांचे कौतुक करत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी आयोजकांचे अभिनंदन करून सर्व उपस्थितांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.**





## डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात अवतरली शिवशाही



डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाने जणू शिवशाही अवतरल्याची अनुभूती झाली. वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून विविध विषयांवर जनजागृती करीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील स्वराज्याचा संदेश पोहचवत शिवजयंती मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या स्वराज्य बॅचतर्फे शिवपर्व-२०२६ चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांची महाआरती करण्यात आली. याप्रसंगी वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ. एन.एस. आर्विकर, डीन डॉ. प्रशांत सोळंके, रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष उदय पाटील, हृदयविकार तज्ज्ञ डॉ. वैभव पाटील, डॉ. माया आर्विकर, प्रा. डॉ. बापूराव बिटे, डॉ. विजय बाविस्कर, आशिष भिरूड, गोपाळ भोळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थी पियूष बिसेन, सुदेश शिंदे, पुष्कर लोंढे, मिहीर पाटील, कृणाल छोले, सिध्देश वंजारी आदींनी पथनाट्य सादर केले.

## थोडक्यात

### मैदानी चाचणीत ४४६ उमेदवार ठरले पात्र

**जळगाव ।** जळगाव जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त १७१ पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. या अनुषंगाने दि. १८ रोजी पार पडलेल्या शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणी घेण्यात आली. या भरती प्रक्रियेसाठी एकूण १५०० उमेदवारांना बोलावण्यात आले होते. त्यापैकी ९६० उमेदवार प्रत्यक्ष चाचणीसाठी उपस्थित राहिले. शारीरिक मोजमापामध्ये अपात्र ६९ तर मैदानी चाचणीत ४४५ अपात्र आणि मैदानी चाचणीत ४४६ उमेदवार पात्र ठरले आहे, असे जिल्हा पोलीस दलातर्फे कळविण्यात आले आहे.

## ग.स.सोसायटीत शिवरायांना अभिवादन



प्रतिनिधी । जळगाव

**येथील जळगाव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी जळगाव येथील ग.स.सोसायटीच्या मुख्य कार्यालयात दि. १९ फेब्रुवारी रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली.**

या प्रसंगी संस्थेचे संचालक तथा पाचोरा गटशिक्षणाधिकारी विजय शांतीलाल पवार, व्यवस्थापक वाल्मीक पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी मुख्य कार्यालयातील अधिकारी व संस्थेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री सद्गुरू अप्पा महाराज पुण्यतिथीनिमित्त आज कार्यक्रम

प्रतिनिधी । जळगाव

जळगाव नगरीचे ग्रामदैवत, श्रीराम मंदिर संस्थान व श्री सद्गुरू अप्पा महाराजांच्या ११५ व्या पुण्यतिथीनिमित्त दि.२० फेब्रुवारी रोजी रामपेठेतील श्रीराम मंदिरात विविध कार्यक्रम होतील. पहाटे नित्याचे काकडा भजन, काकडा आरती, श्री अप्पा महाराजांना प्राप्त झालेल्या प्रभू रामरायांच्या चैतन्यमय उत्सव मूर्तीस व आदिशक्ती श्री संत मुक्ताईंच्या प्रासादिक चैतन्यमय पादुकांना अभिषेक आरती होईल. त्यानंतर श्री अप्पा महाराज समाधी स्थळी सकाळी ९ वा. श्री अप्पा महाराजांचे वंशज व विद्यमान गादीपती ह.भ.प. मंगेश महाराज जोशी यांच्या हस्ते रुद्राभिषेक, नैवेद्य आरतीसेवा होईल.

# रात्री बारानंतर केटरिंग सेवा बंद, लवकरच घेणार निर्णय

प्रतिनिधी । जळगाव

**खानदेश केटरिंग असोसिएशनने कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता लक्षात घेता एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्याचे ठरवले आहे. येत्या काळात रात्री १२ वाजेनंतर केटरिंग सेवा न देण्याचा प्रस्ताव असोसिएशनकडून मांडण्यात आला असून, यावर लवकरच शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.**

असोसिएशनच्या मते, सध्या रात्रीचे कार्यक्रम उशिरापर्यंत म्हणजे पहाटे २ ते ३ वाजेपर्यंत चालतात. यामुळे कर्मचाऱ्यांना पुरेशा विश्राम मिळत नाही. रात्री उशिरापर्यंत काम केल्यानंतर पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजल्यापासून कामावर हजर राहावे लागते. या सततच्या कामामुळे कामगारांमध्ये आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत. अपुऱ्या झोपेत प्रवास आणि काम केल्यामुळे अपघातांच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. केवळ जळगाव जिल्ह्यात केटरिंग व्यवसायावर २० हजारांहून अधिक लोकांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. त्यामुळे या कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न महत्त्वाचा ठरत आहे. गुढीपाडव्याला होणार औपचारिक घोषणा

या प्रस्तावाबाबत असोसिएशनची भूमिका स्पष्ट असून, आगामी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर या निर्णयाचा औपचारिक प्रस्ताव पारित केला जाणार आहे. ही माहिती असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष रतन सारस्वत, जिल्हा उपाध्यक्ष दिनेश टाटिया, जळगाव शहराध्यक्ष सत्यनारायण जोशी, उपाध्यक्ष गोपाल अग्रवाल, सचिव महेंद्र टाडा, कोषाध्यक्ष गोपाल व्यास, मुख्य सल्लागार राजेंद्र वैष्णव आणि इतर पदाधिकाऱ्यांनी दिली आहे. या निर्णयामुळे केटरिंग क्षेत्रात काम करणाऱ्या हजारो कामगारांना दिलासा मिळणार आहे.

# आरोग्य, पाणीपुरवठा अन् पथदिव्यांच्या समस्यांवरून अधिकाऱ्यांना धरले धारेवर

## महापौरांकडून अधिकाऱ्यांची झाडाझडती; आठ दिवसांत कामे पूर्ण करण्याचे आदेश

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील प्रभाग १३ मधील प्रलंबित प्रश्न आणि तक्रारींबाबत महापौरांच्या उपस्थितीत दि. १८ रोजी विशेष बैठक महापौर दालनात पार पडली. या बैठकीत नगरसेवकांनी आरोग्य, पाणीपुरवठा आणि पथदिव्यांच्या समस्यांवरून प्रशासकीय अधिकाऱ्यांना धारेवर धरले. पुढील काळात तक्रारी येता कामा नयेत, अन्यथा कारवाईबाबत विचार केला जाईल, असा इशारा महापौर दीपमाला काळे यांनी अधिकाऱ्यांना दिला.**



या बैठकीच्या सुरुवातीला आरोग्य विभागाच्या कामकाजावर नगरसेवकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. नगरसेविका सुरेखा तायडे यांनी घंटागाडीच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. घंटागाडीचे ड्रायव्हर कोण आहेत आणि त्यांचे मार्ग काय आहेत, याची सविस्तर माहिती नगरसेवकांना द्या. सफाई कामगार नियमित येत नाहीत, अशी तक्रार त्यांनी केली. वैशाली पाटील यांनी गटारींच्या स्वच्छतेचा मुद्दा मांडला. गटारी नियमित साफ होत नाहीत आणि काढलेला कचरा तसाच पडून राहतो. महिला कामगार कचरा गोळा करून निघून जातात, पण तो उचलणार कोण? असा सवाल त्यांनी केला. तर प्रफुल्ल देवकर यांनी आदर्श नगरातील अस्वच्छतेकडे लक्ष वेधले. यावर सहाय्यक आयुक्त (आरोग्य) उदय पाटील यांनी सांगितले की, प्रभाग १३ मध्ये ७,४१० घरे असून कामगारांची यादी निश्चित आहे. कामात कसूर करणाऱ्यांवर दंड केला जात असून, येत्या ५ दिवसांत अपडेट केलेली यादी लोकप्रतिनिधींना दिली जाईल. पाणीपुरवठ्याच्या समस्येवरून नितीन सपके म्हणाले की, दौलत नगर, संभाजी नगर, रायसोनी नगर भागात पाणी नियमित मिळत नाही. गौरी हाईट्स परिसरात पाण्याचा दाब अत्यंत कमी असतो. आपल्याला लोकांचे प्रश्न कायमस्वरूपी मिटवायचे आहेत, असे त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. पाणीपुरवठा अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, दौलतनगर हा भाग उंचावर असल्याने तांत्रिक अडचण येते, ती सोडवण्याचे काम सुरू आहे. तसेच सिंगल कनेक्शन घेतल्यास पाण्याचा फोर्स वाढेल, असेही त्यांनी सुचवले.

# पॅजो रिक्षाच्या धक्क्यावरून तिघांचा हल्ला; चालकावर चॉपरने वार

प्रतिनिधी । जळगाव

**पॅजो रिक्षाचा धक्का लागल्याच्या कारणावरुन तिघांनी मुन्ना रमजान पिंजारी (वय ३६, रा. बिलाल चौक, तांबापुरा) याच्या पार्श्वभागावर चॉपरने वार केले. तसेच त्याच्या रिक्षाची तोडफोड करीत नुकसान केले. ही घटना दि. १६ रोजी नेरी नाका परिसरात घडली. तिघांविरुद्ध एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत माहिती अशी की, शहरातील तांबापुरा परिसरातील बिलाल चौकात मुन्ना पिंजारी यांच्याकडे पॅजो रिक्षा आहे. दि. १६ रोजी (एमएच १९, एस, २३८८) क्रमांकाच्या ॲपे रिक्षातून पाण्याचे जार वाटून ते सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास नेरीनाका परिसरातून घरी जात होते. यावेळी त्याठिकाणाहून जाणाऱ्या तिघांना रिक्षाचा धक्का लागला. यावेळी तिघ अज्ञात हल्लेखोरांनी पिंजारी यांच्या रिक्षाची काच फोडून नुकसान केले. वाद घाणाऱ्यांपैकी एकाने माझे नाव शुभम असून मी कासमवाडीचा दादा आहे. असे म्हणत त्याच्याजवळ असलेल्या धारदार चॉपरने मुन्ना पिंजारी यांच्या पार्श्वभागावर वार केले. तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोहेकॉ प्रमोद लाडवंजारी हे करीत आहे.

# चोपडा नगरपरिषदेत पर्यावरणपूरक पाककला स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

## महिलांनी कौशल्य सिद्ध करून स्वतंत्र अस्तित्व निर्माण करावे : नगराध्यक्षा नम्रता पाटील

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा नगरपरिषदेच्या वतीने आयोजित पर्यावरणपूरक पाककला स्पर्धेतील विजेत्या महिलांचा सन्मान नुकताच करण्यात आला. तसेच महिला सफाई कर्मचाऱ्यांना साडी वाटप करून त्यांचा गौरव करण्यात आला.**

माझी वसुंधरा अभियान ६.० व स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत अन्नपूर्णा महोत्सव आणि पर्यावरणपूरक पाककला स्पर्धा पार पडली होती. या स्पर्धेत तब्बल ६५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. चविष्ट पदार्थांसोबतच पर्यावरणपूरक सजावटीने उपस्थितांची मने जिंकली.

दि. १८ फेब्रुवारी रोजी नगरपरिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात नगराध्यक्षा नम्रता पाटील व मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्या हस्ते रोख रक्कम, प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन विजेत्यांचा गौरव करण्यात आला. पहिल्या पाच विजेत्यांना रोख पारितोषिकासह सन्मानित



- ६५ स्पर्धकांनी घेतला सहभाग
- ५ महिलांना प्रमाणपत्र व ट्रॉफी प्रदान
- महिला सफाई कर्मचाऱ्यांना साडी वाटप

करण्यात आले, तर पुढील पाच महिलांना प्रमाणपत्र व ट्रॉफी प्रदान करण्यात आली. यावेळी नगराध्यक्षा नम्रता पाटील यांनी महिलांच्या कल्पकतेचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे महिलांना व्यासपीठ मिळते, असे सांगितले. मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी महिलांनी विविध क्षेत्रांत सहभाग नोंदवून आपले स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमादरम्यान महिला सफाई कर्मचाऱ्यांना साडी वाटप करून त्यांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या साक्षीने पार पडलेल्या या कार्यक्रमाने महिलांना नवे प्रोत्साहन मिळाले.

### भुसावळातील तरुणाची तापी नदीत उडी

प्रतिनिधी । भुसावळ

येथील काझी प्लॉटमधील रहिवासी हर्षल विलास विसपुते (वय ३२) या तरुणाने बुधवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास तापी नदीवर आपला मोबाईल ठेवत तापी नदीत उडी मारली. रात्री उशिरापर्यंत तरुणाचा शोध न लागल्याने गुरुवारी सकाळपासून शोध मोहीम सुरूच ठेवण्यात आली आहे.

मजुरीची कामे करणारा हर्षल बुधवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास तापी नदीच्या पुलावर आला. यानंतर त्याने पुलावरून खाली नदीत उडी मारली. हा प्रकार रस्त्याने ये-जा करणाऱ्यांनी पाहिला. दरम्यान, नदीत उडी घेण्याआधी हर्षलने त्याचा मोबाईल पुलावर ठेवला होता. यामुळे हा प्रकार उघड झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

## थोडक्यात

### प्रगती विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**रावेर ।** तालुक्यातील रोझोदा येथील लोकशिक्षण मंडळ संचलित प्रगती विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून लोकशिक्षण मंडळाचे अध्यक्ष ललित धांडे, संस्थापक चेअरमन सुधाकर महाजन, व्हाईस चेअरमन लक्ष्मण फेगडे तसेच संस्थेचे इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाटिका, एकपात्री, एकांकिका याद्वारे कलागुणांचा आविष्कार सादर केला. कार्यक्रमाला पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक विजय सुरवाडे यांचे मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन मीनाक्षी दोडके यांनी तर आभार अर्चना महाजन यांनी मानले.

## गर्जना पत्रकार संघातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा!



प्रतिनिधी । जळगाव

**छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आज गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघातर्फे 'शौर्य मराठी'च्या कार्यालयात प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी छत्रपतींचे आचार विचार अंमलात आणण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याचा निर्धार सर्वांनी केला.**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधत आज दि.१९ रोजी गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघातर्फे महाराजांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नरेंद्र कदम, केंद्रीय कार्याध्यक्ष सागर ओतारी, महासचिव भगवान सोनार यांनी मार्गदर्शन केले. शिवरायांना अभिवादन करून सर्वांनी महाराजांचा जयजयकार केला. याप्रसंगी गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष चेतन वाणी, जिल्हा कार्याध्यक्ष हेमंत पाटील, प्रसिद्धी प्रमुख विश्वजीत चौधरी, योगेश चौधरी, योगेश सुने, ज्येष्ठ पत्रकार लालचंद अहिरे, किशोर शिंपी, विकास चव्हाण, संधीपाल वानखेडे, हेमंत शर्मा, विलास सोनार, मनोज जोगी, मुजम्मील सैय्यद, मीनाक्षी चौधरी आदी उपस्थित होते.




जळगाव – येथील ओरिओन इंग्लिश मिडीयम स्टेट बोर्ड स्कूल चे कला शिक्षक युवराज आत्माराम वांगेकर यांनी रंगीत खडूंचा वापर करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त फळ्यावर महाराजांचे चित्र रेखाटले आहे.कलाशिक्षक युवराज वांगेकर यांचे चित्र सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

## पंकज विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे मॅथेक्स परीक्षेत यश

प्रतिनिधी । चोपडा

**महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळ आयोजित गणित प्राविण्य (मॅथेक्स) परीक्षेत येथील पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता आठवीतील सात विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून दुसऱ्या स्तरासाठी पात्रता मिळवली आहे.**



गणित विषयाची गोडी निर्माण व्हावी व विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषणात्मक क्षमता वाढावी, या उद्देशाने महामंडळाकडून दरवर्षी अशा स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये कार्तिक प्रमोद पाटील, हितेश महेंद्र पाटील, तनिष गुरुदास पाटील, तेजस जितेंद्र पाटील, संस्कार शरद शिरसाठ, हर्ष लीलाधर पाटील व तन्मय संदीप पवार यांचा समावेश आहे. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष पंकज बोरोले, संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश पंडित बोरोले, अविनाश राणे, सचिव गोकुळ भोळे नारायण बोरोले, कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## वाळकी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील घोडेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त वाळकी येथील शांताबाई भास्करराव पाटील माध्यमिक विद्यालयात दि. १८ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण १६ बॅग रक्त संकलित करण्यात आले असून रक्तदात्यांचा सन्मान करण्यात आला.**



मुख्याध्यापिका सुवर्णा श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाला मेडिकल ऑफिसर डॉ. शंकरलाल सोनावणे, तालुकाध्यक्ष नितीन अहिरराव तसेच सदस्य राज मोहम्मद यांची प्रमुख उपस्थिती होती. रेडक्रॉस सोसायटी, जळगाव व चोपडा येथील तंत्रज्ञ पथकाने रक्तसंकलनाची प्रक्रिया सुरक्षित व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडली. विद्यालयातील शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, गावकरी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून शिबिर यशस्वी केले. रक्तदान करणाऱ्या सर्व दात्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.

शिवजयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवून महाराजांना अभिवादन करण्यात आल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. विद्यालय प्रशासनाने सर्व रक्तदाते, रेड क्रॉस पदाधिकारी व वैद्यकीय पथकाचे आभार मानले.

## रामपुरात शासकीय अंगणवाडी सुरू करा

- हेमकांत गायकवाड यांची निवेदनाद्वारे मागणी

प्रतिनिधी । चोपडा

**शहरातील रामपुरा वार्ड क्र. ३ येथे शासकीय अंगणवाडी केंद्र नसल्याने सुमारे २५० ते ३०० बालके पूर्वप्राथमिक शिक्षण व पोषण आहारापासून वंचित राहत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते हेमकांत बळीराम गायकवाड यांनी संबंधित शासकीय यंत्रणेकडे निवेदन देत तात्काळ अंगणवाडी मंजूर करून सुरू करण्याची मागणी केली आहे.**

रामपुरा वार्ड क्र. ३ हा आर्थिकदृष्ट्या दुर्बल, कष्टकरी व आदिवासी समाजाची वस्ती असलेला भाग असून येथील लोकसंख्या अंदाजे २ ते ३ हजारांच्या दरम्यान आहे. ० ते ६ वयोगटातील बालकांची संख्या मोठी असतानाही शासकीय सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या शैक्षणिक व शारीरिक विकासावर परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. पूर्वी या भागात खाजगी अंगणवाडी कार्यरत होती; मात्र ती बंद झाल्याने (आयसीडीएस) योजनेअंतर्गत मिळणारा पोषण आहार, लसीकरण व



आरोग्य सुविधा बालकांना मिळत नाहीत. त्यामुळे कुपोषणाचा धोका वाढण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. गायकवाड यांनी राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री, महिला व बालविकास विभाग तसेच जिल्हाधिकाऱ्यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली आहे. स्थानिक नागरिकांनीही या मागणीला पाठिंबा दर्शविला असून प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मजरेहोळ येथे साईबाबा मंदिराचा रौप्य महोत्सव; दोन दिवस भक्तीमय सोहळ्यांची रेलचेल

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा तालुक्यातील प्रति शिर्डी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मजरेहोळ येथील साईबाबा मंदिराचा २५वा वर्धापनदिन (रौप्य महोत्सव) २१ व २२ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने ग्रामस्थ व साईभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

दि. २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता गावातून भव्य शोभायात्रा व पायी दिंडी काढण्यात येणार आहे. ढोल-ताशांच्या गजरात, टाळ-मृदुंगाच्या निनादात आणि साईनामाच्या घोषात ही दिंडी मंदिरापर्यंत पोहोचणार आहे. या शोभायात्रेत भाविकांचा



मोठा सहभाग अपेक्षित आहे.

दि. २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा होणार असून त्यानंतर साईभक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच दिवशी रात्री ८ वाजता कीर्तन केसरी ह.भ.प. विशालजी महाराज खोले (मुक्ताईनगर) यांचे कीर्तन होणार असून भक्तांना आध्यात्मिक मार्गदर्शनाचा लाभ मिळणार आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून अरुणभाई गुजराथी, राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, आमदार चंद्रकांत सोनवणे, तसेच स्थानिक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. साई ग्रामस्थ मित्रमंडळाच्या वतीने तालुक्यातील साईभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसाद व कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अमळनेरमध्ये महाशोभायात्रेस अभूतपूर्व प्रतिसाद

## समाजातील सर्वच घटकांसह माता-भगिनीनींही नोंदविला उत्स्फूर्त सहभाग

प्रतिनिधी । अमळनेर

**कृषी क्षेत्रातील अग्रगण्य सेवाभावी संस्था अक्षय कृषी परिवार व येथील मंगळग्रह सेवा संस्था यांच्यातर्फे माझा संकल्प-भूमी सुपोषण चळवळीसाठी जनजागर व्हावा, याकरिता बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी शहरातून भव्य महाशोभायात्रा काढण्यात आली. या महाशोभायात्रेस अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. समाजाजील सर्वच घटकांनी यात सहभाग नोदविला. त्यात विविध महिला संघटना, शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी- विद्यार्थिनी तसेच वारकरी संप्रदायातील प्रतिनिधींनीही उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला, हे विशेष!**



संतश्री संखाराम महाराज वाडी संस्थानापासून सकाळी ८ वाजता महाशोभायात्रेचा प्रारंभ झाला. संतश्री प्रसाद महाराज यांनी महाशोभायात्रेचे उद्घाटन केले. अक्षय कृषी परिवाराचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. गजानन डांगे व प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांनी श्री भूमीमातेचे पूजन केले. तत्पूर्वी, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त श्रीमती जयश्रीताई साबे, डी. ए. सोनवणे, आनंद महाले, मुख्य कार्यकारी अधिकारी आर. जी. चव्हाण, ग्रीनरी कन्सल्टंट सुबोध पाटील, मंगल सेवेकरी विनोद कदम, प्रकाश मेखा, आशिष चौधरी, निलेश महाजन, बाळा पवार, अमोल महाजन व पत्रकार परिवारातर्फे मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर महाशोभायात्रा मार्गस्थ झाली. सराफ बाजार, तिरंगा चौक, कोफ्लबडी बाजार, हॉटेल पायल, सुभाष चौक, राणी लक्ष्मीबाई चौक, मोठा बाजार, दगडी दरवाजा, फरशी रोडमार्गे श्री मंगळग्रह मंदिरात महाशोभायात्रेची सांगता झाली. महाशोभायात्रेतील सहभागींकरीता मंगळग्रह सेवा संस्थेने नाश्ता, चहा-पान व भोजनाची व्यवस्था केली होती.

सजविलेल्या पालखीत श्री मंगळग्रह देवतेची पंचधातूंची उत्सवमूर्ती ठेवण्यात आली होती. श्री भूमीमाता रथाने अमळनेरकरांचे लक्ष वेधले. तसेच विविध लेझीम पथके, ढोल पथक, संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थानाच्या वेदपाठशाळेतील बाल वारकरी, तालुक्यातील विविध भजनी मंडळांनी महाशोभायात्रेत सहभाग नोंदविला.

### मान्यवरांची लाभली उपस्थिती

महाशोभायात्रेत उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, खान्देश शिक्षण मंडळाचे चेअरमन नीरज अग्रवाल, संचालक पंकज मुंदडे, योगेश मुंदडे, लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. संदीप जोशी, सचिव महेंद्र पाटील, मनीष जोशी, नितीन विंचूरकर, डॉ. रवींद्र कालरा, डॉ. मिलिंद नवसारीकर, डॉ. धीरज कोकाटे, प्रीतेश पारख, प्रकाश जैन, अभिनय मुंदडा, माळी समाजाचे अध्यक्ष मनोहर महाजन, लिनेस क्लबच्या डॉ. मयूरी जोशी, सोनल जोशी, कविता पारख, यजदी भरूचा, प्रदीप जैन, सुनील चौधरी, राजेश कुंदनानी व सूरज वरलानी, महावीर पहाडे, श्रमसाफल्य एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष अभिजीत भांडारकर, माजी नगरसेवक संजय पाटील आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.